# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women In Distress Situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **10/02/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मालेगाव येथील पोलीस अंमलदार HC गजानन वाणी व PC गजानन खंदारे यांची डायल 112 चे वाहनावर गस्त सुरू असताना त्यांना गस्ती दरम्यान एक बेवारस पर्स मिळून आली त्यामध्ये मौल्यवान वस्तू व दागिने असल्याने नमूद पोलिसांनी सदर महिलेचा शोध घेऊन त्यांना त्यांची पर्स परत केली असून त्यांनी केलेल्या प्रामाणिक कामगिरीचा एक चांगले उदाहरण पेश केले आहे.

## मालेगांव पोलिसांचा असाही प्रामाणिकपणा

देशोन्नती वृत्तसंकलन...



**मालेगाव** ■ मालेगांव पोलीस स्टेशनच्या हद्दीत बीट मार्शल डायल ११२ नुसार ६ फेब्रुवारी रोजी पेट्रोलींग सुरु असतांना जुने बस स्टॅन्ड वर पोलीसांना एक पर्स मिळाली . ती पर्स वाशीम येथील एका महिलेची असल्याची माहीती मिळाल्याने ती त्यांनी सदर महिलेला दिली.त्यावेळी सदर महिलेने पोलीसांप्रती समाधान व्यक्त केले

६फेब्रुवारी रोजी पोलिस स्टेशन मालेगाव हद्दीत बीट मार्शल, डायल - ११२ पेट्रोलिंग दरम्यान सौ. वर्षा रवी इंगोले रा. वाशिम यांची मालेगाव जुने बस स्टँड येथे गहाळ पर्स मिळाली . ज्यामधे नगदी रोख ६८० रुपये व चांदीचे तोरड्या व जोडवे असे मिळून आले . सदर माहिती पोलीसांनी व्हॉटसअप वर शेअर केली होती. तेव्हा सदर पर्स ही वाशिम येथील सौ वर्षा इंगोले या महिलेची असल्याची माहिती मिळाली . त्यावरून सदर महिलेला पोलीसांनी फोनद्वारे माहिती देऊन त्यांना पोलीस स्टेशन मालेगाव येथे बोलावून घेतले . आणी पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांचे मार्गदर्शनाखाली पोहका गजानन वाणी पो का गजानन खंदारे यांनी सदर पर्स, व त्यातील मौलवान वस्तू व पैसे सौ. वर्षा रवी इंगोले व त्यांचे पती यांचे ताब्यात दिले. पर्स मिळाल्याचा आनंद महीलेच्या चेहऱ्यावर दिसत होता . पोलीसांच्या या सामाजिक दायीत्त्वाप्रती तसेच त्यांच्या प्रामाणिक पणाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे .( श.प्र.)